वाचा : १) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र. तिर्थवि २०१६/प्र.क्र.१०९/योजना-६ दि.२८/१२/२०१६.

२) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय क्र. तिर्थवि २०१६/प्र.क्र.१०९/योजना-६, दि.०६/०१/२०१७.

३) का.अ. ग्रा.पा.पु. विभाग, जि.प. नाशिक यांचे तांत्रिक मंजुरीचे पत्र क्र. जिपना/ग्रापापुवि/तांमा/रेशा-१६/३७४, दि.१७/०३/२०१७.

४) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र. झेडपी-२०१२/प्र.क्र.६८०/वित्त-०९, दि.३१ जानेवारी, २०१३.

५) दि.२१/११/२०१७ रोजीच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त जा.क्र.साप्रवि/परिषद/१३८७, दि.१६/१२/२०१७.

---

# कार्यादेश

जा.क्र.जिपना/ग्रापापुवि/निविदा/ ६४ /२०१७
दिनांक : 9/01/18

प्रति,
**मे. श्रमगाथा असोसिएट,**
३२/५ अ, नामपुर रोड,
मालेगांव कॅम्प, ता.मालेगांव जि.नाशिक.

क्री-1138

संदर्भिय शासन निर्णय क्र.१ अन्वये, श्री गुरु गोरक्षनाथ शिवपंचायत मंदिर, गाळणे, ता.मालेगाव, जि.नाशिक या तिर्थक्षेत्रास "ब" वर्ग दर्जा प्राप्त झालेला आहे. संदर्भिय शासन निर्णय क्र.२ अन्वये, पिण्याच्या पाण्याची टाकी व अनुषंगिक कामे या कामांसाठी रक्कम रु.२९.७४ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्याअनुषंगाने सदर कामाची निविदा आपल्या नावे, **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक** यांनी **अंदाजपत्रकीय दराने** खालील नमुद अटि व शर्ती नुसार मजुर करण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाबाबत आपण सदरचे काम करण्याबाबत करारनामा करुन दिलेला आहे.

त्यानुसार खालील दर्शविलेले काम, मंजुर ब-१ ई-निविदेप्रमाणे सुरु करावे. उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, मालेगाव यांना सदर कामाची देखरेख करण्याबाबत अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. काम सुरु करण्याची तारिख या आदेशाच्या दिनांकापासून असुन, करारनाम्याप्रमाणे सदरचे काम पुर्ण करण्याची अंतिम मुदत दि.३१/०३/२०१८ पर्यंत आहे. सोबत ब-१ ई-निविदेची प्रत जोडुन पाठवित आहे.

सदरचे काम सुरु असतांना, कामावर हजर राहणा-या जबाबदार व्यक्तीचे नाव या कार्यालयास कळविण्यात यावे. या कामाबाबतचा सर्व पत्रव्यवहार, उपविभागामार्फतच करण्यात यावा. करारनाम्याप्रमाणे शासकीय संचालनाकडे कामागारांचा व कामाचा विमा उतरविणे अनिवार्य आहे. सदर कामाचा सदोष दायित्व कालावधी काम पुर्ण झाल्यानंतर १२ महिने राहील.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदेची किंमत रुपये | कामाचा दर | स्विकृती निविदेची किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत, श्री गुरु गोरक्षनाथ शिवपंचायत मंदिर, गाळणे, ता.मालेगाव येथे नळ पाणी पुरवठा योजना करणे | २७,८७,३४१/- | अंदाजपत्रकीय दराने | २७,८७,३४१/- | दि.३१ मार्च, २०१८ पर्यंत |

लेखाशिर्ष : तर्थक्षेत्र विकास कार्यक्रम

प्रशासकीय मंजुरी : ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र. तिर्थवि २०१६ /प्र.क्र.१०९/योजना-६, दि.०६/०१/२०१७.

**अटी व शर्ती :**

१. योजनेच्या उद्‌भवास पुरेसे पिण्यायोग्य पाणी उपलब्ध असल्याची खात्री करुनच योजनेची पुढील कामे हाती घेण्यात यावीत.

२. सदर कामासाठीची जागा ग्रामपंचायत/देवस्थानाच्या मालकीची असल्याबाबत खात्री करावी. तसेच सदरची जागा खाजगी मालकीची असल्यास, त्याबाबत ग्रामपंचायत/देवस्थानाच्या नावे दानपत्र केल्याबाबत करारनामा केलेला असल्याची खात्री करावी.

३. विहीत मुदतीत काम पुर्ण न केल्यास, जिल्हा परिषद प्रतिदिनी जो दंड आकारेल, तो आपणास बंधनकारक राहील.

४. सदर कामासाठी आवश्यक असलेलया सर्व विभागाची परवानगी घेतल्याबाबतची खात्री करावी.

५. सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर, सदरहू काम तिर्थक्षेत्र विकास योजनेतुन घेण्यात आल्याचा नामफलक कामाच्या ठिकाणी ठळकपणे दिसेल असा लावण्यात यावा.

६. सदर कामासाठी कोणल्याही प्रकारचा अतिरिक्त मोबदला (उदा. भाववाढ इत्यादी) तसेच कोणताही अग्रीम (Advance) जिल्हा परिषदेमार्फत अदा केला जाणार नाही.

७. सदर कामाचे लेखापरिक्षण झाल्यावर, लेखापरिक्षणास काही शक अगर वसुली निघाल्यास, त्याची पुर्तता करण्याची जबाबदारी आपली राहील.

८. वाचा मधील संदर्भ क्र.२ व ३ मधील अटी व शर्ती लागु राहतील.

९. तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय, शासन परिपत्रके, शासन अध्यादेश, शासन पत्रे लागु राहतील.

१०. सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर, ग्रामपंचायत/देवस्थानास हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

9/1/18

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

**प्रत :** उप अभियंता, ग्रा.पा.पु. उप विभाग, मालेगांव यांना माहीतीस्तव रवाना.

**सोबत :** ब-१ निविदेची प्रत जोडुन पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

**प्रत :** उप विमा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण भवन २६४ पहिला मजला कला नगर समोर वांद्रे, पुर्व मुंबई ४०००५१ यांना माहितीसाठी रवाना.